# जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर


**सिध्देश्वर पेठ, सोलापूर,**

**जिल्हा नियंत्रण कक्ष**

दूरध्वनी क्र.0217-2731012 फॅक्स : 0217-2621120 Email ID—ddmo.rfsol-mh@gov.in


जा.क्र. 2020/मशा/कार्या-4/जिनिक/प्र.क्र.-24/आरआर- 1170 दिनांक-23/07/2020

**वाचले :-** 1. भारतीय साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, 1897

2. आपत्तीव्यवस्थापनकायदा, 2005 चेकलम 65(1)(ब)

3. मा. आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचेकडील पत्र क्र.राआसोम /कोरोना विषाणू/मार्गसूचना/115292/2020 दिनांक 06 मार्च, 2020

4. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभागाकडील अधिसुचना क्रमांक कोरोना-20208/प्र.क्र.58/ आरोग्य-5 दिनांक- 14 मार्च, 2020

5. केंद्रीय आरोग्य व कुटूंब मंत्रालय यांचे इमआर डिव्हीजनकडील सुचना दिनांक 07 एप्रिल, 2020

6. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडील पत्र क्र. जि.प.सो./आरोग्य/एनएचएम /667/2020 दिनांक- 17/04/2020

7. उपविभागीय अधिकारी सोलापूर क्र. 1, सोलापूर यांचेकडील पत्र क्र. 2020/उविअक्र.1/जबाबी/कावि-1172/2020 दि. 22.07.2020

COLLECTOR OF SHOLAPUR

**विषय :-** **<u>कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखणेकामी उपाययोजना</u>**
बार्शी तालुक्याकरीता Covid Care Center साठी संस्था / इमारत अधिग्रहण करणेबाबत.

**आदेश**

ज्याअर्थी, माहे डिसेंबर २०१९ अखेरपासून चीन देशातील वुहान शहरामध्ये कोरोना विषाणुच्या (Novel Corona Virus) प्रार्दुभावामध्येअनेक रुग्ण मृत्युमुखी पडलेलेआहे. तसेच सदर कोरोना विषाणुमुळे इटली, जपान, इराण, हॉगकॉग, दक्षिण कोरीया, अमेरिका इत्यादी देशामध्ये रुग्ण संख्या वाढत आहे.

ज्याअर्थी, सदर कोरोना विषाणुने बाधित रुग्ण इतर देशांतून भारतामध्ये येत असून त्यामुळे आपल्या देशातील नागरिकांना सदर कोरोना विषाणुपासून धोका निर्माण होऊन मानवनिर्मित आपत्तीची परिस्थिती निर्माण झालेली आहे.

ज्याअर्थी, आंतरराष्ट्रीय स्तरावर व देशांतर्गत कोरोना या विषाणूचे संसर्ग बाधीत रुग्ण सोलापूर जिल्ह्यामध्येही प्रवास करीत असल्याने सोलापूर जिल्हयामध्ये कोरोना या विषाणूचा संसर्ग व प्रादूर्भाव पसरण्याची शक्यता नाकारता येत नाही. सद्यस्थितीमध्ये कोरोना या विषाणूचा संसर्ग व प्रादुर्भाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व कोरोना विषाणूचे संसर्गरोखणेसाठी त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे.

ज्याअर्थी, वरील वाचले क्रमांक 7 नुसार उपविभागीय अधिकारी सोलापूर, क्र. 1, सोलापूर यांनी बार्शी तालुक्याकरीता Covid Care Center साठी संस्था / इमारत अधिग्रहण करणेबाबतचा प्रस्ताव सादर केलेला आहे.

ज्याअर्थी, उपोद्धोषातील अ.क्र. 4 मधील शासन अधिसूचनेनुसार तयार करणेत आलेल्या महाराष्ट्र कोव्हिड-19 उपाययोजना नियम, 2020 अन्वये जिल्हाधिकारी सोलापूर यांना सोलापूर जिल्ह्याच्या कार्यक्षेत्रात कोव्हीड 19 वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखणेसाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

ज्याअर्थी, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, 2005 मधील कलम 65 (1) (ब) नुसार आपत्ती कालावधीमध्ये बचाव कार्याच्या प्रयोजनार्थ जमीन इमारत किंवा इमारतीचा भाग अधिग्रहण करणेचा अधिकार अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांना असल्याचे तरतूद आहे.

त्याअर्थी, मी मिलिंद शंभरकर, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, सोलापूर असा आदेश देतो की, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, 2005 मधील कलम 65 (1) (ब) नुसार तसेच वरील उपोद्धोषातील मधील महाराष्ट्र कोव्हिड उपाययोजना नियम, 2020 नियम 10-ए नुसार प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन खालील प्रमाणे इमारत / संस्था Covid Care Center करीता अधिग्रहीत करीत आहे.

**Covid Care Center**

| अ.क्र. | इमारतीचे नांव | बेडची क्षमता |
|---|---|---|
| 1) | आदर्श लॉन्स, बार्शी | 100 |

त्यानुसार, तक्यामध्ये नमुद रूग्णालये / आस्थापना यांनी कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव संपे पर्यंत आपले रूग्णालय / संस्थेचे इमारत व परिसर तसेच रूग्णालयातील / संस्थेतील मनुष्यबळ व जीवरक्षक प्रणालीसाठी आवश्यक साधन सामग्रीचा ताबा तहसिलदार बार्शी यांचेकडे देणेत यावा. कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखणेकामी सदरचा आदेश आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, 2005 अन्वये सर्व संबंधितांवर बंधनकारक राहिल.

COLLECTOR OF SHOLAPUR

**(मिलिंद शंभरकर, भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, सोलापूर**

**प्रति,**

1) जिल्हा शल्यचिकित्सक, सोलापूर
2) उपविभागीय अधिकारी सोलापूर क्र. 1, सोलापूर
3) तहसिलदार बार्शी

   **2/- तहसिलदार बार्शी यांनी उपरोक्त नमूद संस्था / महाविद्यालयातील सर्व सोयी सुविधा तसेच आवश्यक त्या दुरुस्त्या बाबतचे कामकाज उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बार्शी यांचेकडून तातडीने पुर्ण करुन घेऊन सदर संस्था / महाविद्यालय / खाजगी इमारतीचा ताबा तालुका आरोग्य अधिकारी, बार्शी यांचेकडे सुपर्द करावा.**
4) मुख्याधिकारी, बार्शी नगरपरिषद, बार्शी
5) तालुका आरोग्य अधिकारी, बार्शी

   **2/- तालुका आरोग्य अधिकारी, बार्शी यांनी तहसिलदार बार्शी यांचेशी समन्वय साधून उपरोक्त संस्था / महाविद्यालय / खाजगी इमारतीचा ताबा तातडीने घ्यावा.**
6) व्यवस्थापक शासकीय /खाजगी आस्थापना/ रूग्णालय/ संस्था ________________

**प्रत-**

1) मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर
2) जिल्हा आरोग्य अधिकारी, सोलापूर